# ५. वाळवण

- रा. रं. बोराडे

रावसाहेब रंगराव बोराडे (जन्म : १९४०)

ग्रामीण साहित्य चळवळीचे प्रवर्तक. ज्येष्ठ ग्रामीण कथा, कादंबरीकार म्हणून सर्वपरिचित. कथा, कादंबरी, नाटक, वगनाट्य इ. साहित्यप्रकारांत विपुल लेखन. समाज, रीति-रिवाज, प्रथा-पंरपरांच्या अनुषंगाने ग्रामीण जीवनाचे सखोल भान.

१९५७ पासून कथा लेखनाला प्रारंभ. सहा दशकापासून सतत लेखन. १९६२ साली 'पेरणी' हा पहिला कथासंग्रह प्रकाशित. यानंतर 'ताळमेळ', 'मळणी', 'वरात', 'नातीगोती', बोळवण, 'फजितवाडा', 'माळरान', 'वानवळा' असे महत्त्वाचे कथासंग्रह. 'पाचोळा', 'सावट', 'आमदार सौभाग्यवती', 'चारापाणी', 'इथं होतं एक गांव' या कादंबऱ्या.याशिवाय नाटक आणि वगनाट्यातून विनोदी लेखन प्रसिद्ध. १९८९ मध्ये हिंगोली येथे झालेल्या मराठवाडा साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष ही ते होते.

प्रस्तुत कथेचा नायक हा शेतीशी जिव्हाळा असणारा पारंपरिक शेतकरी आहे. शेतीमध्ये त्याची भावनिक गुंतवणूक आहे. त्याचा मुलगा हा यांत्रिकीकरणाने भारावलेला आहे. या पितापुत्रातील संघर्ष हा केवळ दोन पिढीतील नसून दोन भिन्न मूल्यव्यवस्थेतील आहे. बोराडे यांनी तो प्रत्ययकारीपणे रेखाटला आहे.

उन्हातली रखरख अधिकच वाढली. डोळ्यांतल्या बुबुळांवर ज्वाळाचे झपकारे बसल्यावनी वाटू लागलं. डोळ्यांवर आडवा हात घेतल्याशिवाय उन्हाकडं पाहाणं अशक्य झालं.

खोपीत बसल्याबसल्याच जयवंतरावांनी डोळ्यांवर आडवा हात घेतला. अधू झालेल्या नजरेनं पांदीकडं पाहिलं. अपेक्षित व्यक्ती दिसली नाही तेव्हा ते अस्वस्थ झाले. हातालगत पडलेली काठी त्यांनी उचलून घेतली. शरीराचा भार तिच्यावर टाकीत ते उभे राहिले. काठीच्या आधारानं चालत ते बाहेर आले. पलाणीवर चढून त्यांनी गावाकडंच्या वाटंनं पाहिलं. जितकं दूरवर पाहता येईल तितकं दूरवर पाहिलं. माणसाचा मागमूस लागेना तेव्हा ते कमालीचे अस्वस्थ झाले. गावाकडंच्या वाटेकडं लागलेली नजर त्यांनी काढली. पायाखालच्या दंडाकडं पाहिलं. दंड कोरडा भगभगीत दिसत होता. चिरांचं वाकडं-तिकडं जाळं त्याच्यावर अंथरलं गेलं होतं. दंडाची अशी अवस्था व्हावी हे साहजिक होतं. गेल्या पंधरा दिवसांत त्याला पाण्याचा स्पर्श नव्हता. अर्थात त्या अगोदर दंडातून पाणी फार खळाळत होतं असं नाही; पण दिवसातून एकदा दंड निश्चितच ओला होत होता. या पंधरा दिवसांत तर तेही शक्य झालं नव्हतं. दंडाची तहान भागण्यापुरतंही पाणी विहिरीतून वर आलं नव्हतं. आणि त्यामुळेच दंड कोरडा भगभगीत दिसत होता. दंडाच्या बाजूला वाढलेलं गवत गोचडल्यावनी दिसत होतं. जयवंतरावांनी एक खोल उसासा सोडला. पलाणी-वरून चालत ते विहिरीकडं निघाले. चालता चालताच त्यांनी उसाकडं पाहिलं. कमरेला भिडलेला



Scanned with OKEN Scanner

ऊस वाळून कोळ झाला होता. आगीची आच लागल्या-नंतर उभं पीक होरपळून निघावं तसा दिसत होता. थोडंसं जरी वारं सुटलं तरी खळखळ असा आवाज येत होता. उसाचं वाळलेपण अधिकच जाणवत होतं. जयवंतरावांना त्या उसाकडं पाहावंना. काळजात चरे पडल्यावनी वाटू लागलं. वेदनेनं त्यांचा चेहरा झाकोळून आला. मोगड्याच्या तोंडाला चिखलाचा ढेपसा बसावा तसं आपल्या नरड्यात झालं आहे असं त्यांना वाटू लागलं. मोठ्या मुश्किलीनं त्यांनी पाऊल उचललं. काठीचा अधिकच आधार घेत ते विहिरीच्या काठावर आले. पाण्याचा अंदाज घेण्यासाठी त्यांनी आत डोकावलं. पाणी म्हणावं तसं चढल्याचं दिसत नव्हतं. खरं तर पुरेपूर पंधरा दिवसांत पाण्याचा उपसा झालेला नव्हता. इतक्या दिवसांत निम्मी- अधिक विहीर भरावयास हरकत नव्हती. पण तसं काही झालं नव्हतं. विहिरीच्या पाण्याची पातळी म्हणावी तशी वाढली नव्हती. विहिरीतली नजर त्यांनी बाहेर उपसली. काठावरच्या इंजिनच्या ओट्याकडं पाहिलं. ओट्यावर इंजिन नसल्यामुळं ओटा अतिशय भकास वाटत होता. एखाद्या थडग्यावनी दिसत होता. जयवंतरावांना अतिशय गळून गेल्यावनी वाटू लागलं. काठीच्या आधारानं चालत ते चिंचेच्या सावलीत आले. आधार मोडल्यावनी बसून राहिले. त्यांचं मन अतिशय व्यथित झालं. आपल्या हयातीत असं काही पाहावं लागलं, असं त्यांना कधीच वाटलं नव्हतं. त्यांना आपल्या ऐन उमेदीचा काळ आठवला. हाच मळा त्या वेळी कसा गजगज वाटत होता. लेकराबाळांनी घर भरलेलं असावं तसा दिसत होता. एक मोट चालण्याइतपत विहिरीत पाणी होतं. चार बैलांची मोट भरगच्च चालत होती. मोट एकदा सुरू झाली की संबंध मळा जागा झाल्यावनी वाटायचा. पाण्यानं भरलेली मोट पाणी सांडीत विहिरीतून वर येऊ लागली की, पोटुशी लेक बाळंतपणासाठी हसत हसत माहेरी यावी तसं वाटायचं. कण्याच्या एका विशिष्ट लयीत होणारा आवाज कानात सारखा भरून राहावयाचा. मोटकऱ्याच्या ललकारीमुळं आणि त्याच्या मोटेवरच्या गाण्यामुळं सबंध मळा जिवंत झाल्यावनी वाटायचा. दंडातून खळखळत जाणाऱ्या पाण्याकडं पाहलं की, हसणाऱ्या नातवाची आठवण यायची. दंडाच्या कडंनं हिरव्यागार हरळीची थप्पी लागलेली असायची. केवळ हरळीच हिरवीगार दिसायची असं नव्हे तर सबंध मळा हिरव्यागार साजानं खुललेला असायचा. तो साज किती पाहू आणि किती नको असं सारखं वाटत राहायचं. पण आता त्यापैकी काहीच उरलं नव्हतं. काळ बदलत गेला होता. शिवारातला मोटंचा आवाज कमी होत होता व इंजिनची टक्टक् सारखी वाढत होती. अशातच एके दिवशी त्यांच्या उमेदीत असलेल्या पोरानं विहिरीवर इंजिन बसविण्याचा आपला इरादा बोलून दाखविला होता. जयवंतरावांना तो विचार मुळीच मानवला नव्हता. त्यांनी करता येईल तितका त्याला विरोध केला होता. पण त्यांच्या पोरानं- सदाशिवानं कशालाच दाद दिली नव्हती. त्यानं मोटंचे चारही बैल मोडले होते. सहकारी सोसायटीचं थोडं-फार कर्ज काढलं होतं. व काळाभंगार धूर ओकीत बसणारं इंजिन विहिरीवर आणून बसविलं होतं. तेव्हापासून या मळ्याची कळाच पार बदलून गेली होती. त्यांच्या ऐन उमेदीच्या काळात मोटंच्या पाण्यावर उसाची जोपासना तर ते करीत होतेच; पण त्याशिवाय कांदे, लसूण, चिमकुरा, वांगे, भोपळा आदी संसारात अत्यावश्यक असलेल्या वस्तुंची लावणही करीत होते. पोटच्या पोराची काळजी घ्यावी तशी त्यांची काळजी घेत होते. पण सदाशिवानं कारभार हातात येताच या सगळयांना काट मारली होती. अशा प्रकारच्या पिकांपासून पैसा उभा राहण्याची गोष्ट तर बाजूला राहतेच; पण शिवाय रानही बरंच गुंतून



Scanned with OKEN Scanner

पडतं असं त्याचं या बाबतीतलं मत होतं. आणि म्हणूनच ज्या घरातून टोपलं टोपलं भाजी नातलगाकडं पाठविली जात होती त्याच घरात आज तराजूनं जोखून भाजी विकत घेतली जात होती. अशाच काही कारणांनी सदाशिवचे आणि त्यांचे खटके उडत होते. पण सदाशिव त्यांचं काहीच चालू देत नव्हता. या मळ्यातून आपलं सारं लक्ष काढावं व खुशाल घरी हरी हरी करीत बसावं असं त्यांना सारखं वाटत होतं. पण त्यांना ते शक्य होत नव्हतं. या मळ्यावरून कायमची नजर काढावयाची असं ते प्रत्येक वेळी ठरवीत होते. तेवढ्यापुरती नजर काढीतही होते, पण दुसऱ्याच क्षणी परत नजरेचं पांघरुण मळ्यावर घालीत होते. सदाशिवच्या फारसं विरोधात न जाता मळ्याची देखभाल करीत होते. गेल्या पंधरा दिवसात तर मळ्याची स्थिती फारच बिघडली होती. इंजिनात काही तरी बिघाड झाल्यामुळं ते दुरुस्तीसाठी तालुक्याच्या गावी जाऊन पडलं होतं आणि तेव्हापासून सतत पंधरा दिवसात उसाचं पाणी तुटलं होतं. पाण्याअभावी ऊस सारखा वाळत चालला होता. ते दररोज इंजिनाची वाट पाहात होते. आज सदाशिव इंजिन घेऊन येईल असं त्यांना सारखं वाटत होतं. पण इंजिनही येत नव्हतं आणि सदाशिवही येत नव्हता. पंधरा दिवसांत एकाच गोष्टीची पुन्हा पुन्हा त्यांना जाणीव होत होती. सदाशिवानं भरा उकलण्याचं मनात आणलं तेव्हा त्याला आपण प्रखर स्वरूपाचा विरोध करावयास हवा होता असं त्यांना आता वाटू लागलं. आज तोच भरा असता तर उसनं-पासनं करून का होईना; तेवढ्यापुरती मोट जुंपता आली असती व उसाचीही वाळवण रोखता आली असती. अर्थात व्हायचं ते होऊन गेलं होतं. आता त्याबद्दल विचार करण्यात फारसा फायदा दिसत नव्हता. इंजिनची वाट पाहाण्यापलीकडे दुसरं काहीच करता येण्यासारखं नव्हतं... बसल्या बसल्या त्यांनी परत पांदीकडं पाहिलं. त्यांचा गडी गोपाळा त्यांची दुपारची भाकर घेऊन येत होता. जयवंतरावांच्या मनात अंधुकशी आशा पालवली. गोपाळा जवळ येईपर्यंत ते टकाटका त्याच्याकडं पाहात राहिले व तो जवळ आल्यानंतर त्यांनी विचारलं,

"सदाशिव आला व्हय रं ?"

गोपाळनं हातातलं कोरडेशाचं लोटकं भुईवर ठेवलं. हातातल्या भाकरी त्याच्यावर झाकल्या व खाली बसत तो म्हणाला,

"आजुक तर काय पत्या न्हाई"

"काई सांगावा तरी आला का ?"

"छ्या! येताना म्या पुसलं घरात, पर आल न्हाई म्हनले."

जयवंतरावांनी गुडघ्या भोवती हात बांधले व तोंडाला मिट्टी मारल्यावनी ते बसून राहिले. गोपाळा थोडा वेळ थांबला. त्यानं एकवार वाळत चाललेल्या उसाकडं पाहिलं. एकवार जयवंतरावाकडं पाहिलं व दबकत बोलल्यावनी तो बोलला,

"नाना, जिवून घ्यायचं करा की. दिवस पार लांब गेलाया."

"कसं जिवू म्हनतोस रं! उसाची हालत कशी झालीया ते बगितलंस का ?"

"तुमी जेवला न्हाय म्हनून काय हालत सुधारनार हाय का ?"

"बगवंना झालंया रं मला, तटतटा काळीज तुटाया लागलंया. काय हालतीत मळा होता आन् काय हालतीत बगायचा आला !"

"तुमी तरी काय करणार त्येला. तुमच्या हातात व्हता तवर तुमी मस्त निगा ठिवली की मळ्याची. आता तुमच्या हातातच काय न्हाई तर तुमी तरी काय करणार ?"



Scanned with OKEN Scanner

"ते झालं रं, पर सदानं तरी आसं कसं वागावं! हातात कारबार ध्यायचा म्हनल्यावर ध्यान दिऊनी का असल्या गोष्टीकडं."

"त्येंचंबी ध्यान आसंल की. आता काय लहान हायीत का ते !"

"ध्यान आसतं तर आसं कस्याला झालं आसतं! पंधरा दिवस ऊस बिना पाण्याचा कस्याला टिवला असता. दुसरा एकादा असता तर काय तरी जाडाजोड केली नसती का ?"

"चार दिसाम्हागं आले तवा कवा यील म्हनले इंजिन नीट हून ?"

"आता हिंग झालंच म्हनतो. आनायला म्हणून जातो आन् तिकडचं चार चार दिवस बसतो. आसलं कसलं नीट करनं हाय म्हनावं !"

"परसोध्यानचं काम हाय नाना. हितली गावातली गोस्ट न्यारी हाय. मोडतोड झाली तर दट्टया लावून करून घ्यायला येतं. तिंत शेरात कोण कुणाला मापायलंय. हिंग देतो म्हणतेत् आन् आन् चार दिवस लावतेत. मालकांनी तरी काय करावं!"

"करायला बसल्यावर समदं व्हतं. पण करायचं मनात फायजी की. मिट्टी मारून बसलं त्या बाबाजवळ तर का करून देत न्हाई? पर बारा घरचं काम ह्येच्या म्हागं. त्या बाबाजवळ बसायला फुरसत फायजी की ह्येला ! बरं तो बाबा करून देत न्हाई म्हनला येळंवर तर लगेच त्येचा बाप दुसरा. उचलायचं इंजिन की न्ह्यायाचंच दुसऱ्या बाबाकडं."

काय बोलावं हे गोपाळाला समजंना. आता हा विषय इथंच थांबविलेला बरा हे लक्षात घेऊन तो म्हणाला,

"नाना, उगं घोर लावून घ्यायलाव तुमी जीवाला, त्येंच संसार त्येंच्या म्हागं हाय. उठा आता. बसा जेवायला"

इतकं बोलून तो खोपीकडं गेला. जयवंतरावांनी कसलीच हालचाल केली नाही. सुतक पडल्यावनी ते बसून राहिले. खोपीत शिरलेला गोपाळा घाईने बाहेर आला. हातातलं भाकरीच गाठोडं जयवंतरावांना दाखवीत म्हणाला, "नाना, सकाळी न्ह्यारी केला न्हाव व्हय?"

जयवंतरावांनी त्याच्या हातातल्या भाकरीच्या गाठोड्याकडं पाहून न पाहिल्यासारखं केलं. कसलाही भाव चेहऱ्यावर न दाखविता ते म्हणाले,

"न्हाई."

" "का?

"खावीच वाटली न्हाई."

"आसं केल्यानं कसं व्हायचं! पोटाला पोटभर खाल्लं तरी फायजी की ! "

जयवंतराव स्तब्ध राहिले. गोपाळा बसल्याबसल्याच पुढं सरकला. बिंदगीतलं पाणी त्यानं तांब्यात ओतलं व तो तांब्या त्यांच्यासमोर धरीत तो म्हणाला,

"घ्या नाना, धुवा हात."

जयवंतरावांनी त्याच्या हातातला तांब्या घेतला. हातावर पाणी सोडीत त्यांनी हात धुतले. चूळ भरली व एक मांडी खाली टाकून ते जेवायला बसले. गोपाळनं भाकरीचं गाठोडं सोडलं. लोटक्यातलं कोरड्यास ताटलीत ओतलं व ती ताटली त्यांच्या समोर सारली, ताटलीतल्या कोरडेश्याकडं पाहात जयवंतरावांनी विचारलं,

"कस्याचं कोरड्यास हाय रं?"



Scanned with OKEN Scanner

गोपाळालाही निश्चित अंदाज करता येईना. त्यानं ताटलीची एक बाजू उचलून धरली व कोरडेश्यातली वांग्याची फोड लक्षात घेत तो म्हणाला,

"वांग्याचं हाय काय की !"

जयवंतरावांच्या मनात काही तरी उमटलं. पण ते त्यांनी मुकाट्यांनं गिळलं. जणू काही झालच नाही असं दाखवित ते म्हणाले,

"न्ह्यारीच्या रोटीवर काय कोरड्यास हाय बग रं !"

"का, वांगं खात न्हाव का ?"

"वांग वाताळ आसतं न्हवं का. कुतरं चावल्यापासनं वांगं सोडलंया खायचं."

"मंग दिलं कसं मालकीनबायनी. तुमी वांग खात न्हाव हे काय ठावं न्हाय काय त्येनला ?"

सारं काही या गड्याजवळ ओकून टाकावं, कारभारीण खर्चल्यापासून आपल्याला आवडत नसलेल्या अनेक गोष्टी आता आपल्यासमोर येत असतात, हे त्याला सांगावं असं त्यांना प्रथम वाटलं. पण दुसऱ्याच क्षणी त्यांनी आपल्या मनाला आवर घातला. घरातल्या गोष्टी काढून असं चव्हाट्यावर मांडणं त्यांना योग्य वाटंना, ते इतकंच म्हणाले,

"असायला समदं ठाव हाय तिला, पण वांग्याच्या रस्याला काई व्हत नसतं म्हनं. वांगं वातळ असतं, पर रस्सा वाताळ नसतो म्हनं!"

"मग रस्सा ना खायला काय झालं ?"

"भावतच न्हाई मनाला...एकदा ध्यान उडालं ते उडालंच."

गोपाळा सारं काही समजून चुकला. त्यानं न्ह्यारीची भाकर सोडली.त्यातल्या दुमत्या केलेल्या भाकरीत-डोकावत तो म्हणाला,

"ठेसा हाय मिरच्याचा."

"चेहऱ्यावर कसलाही फरक न होऊ देण्याचा प्रयत्न करीत जयवंतराव म्हणाले, "

"वाड उलसाक.लागला तर पुना घीन."

गोपाळनं त्यांच्या समोरच्या भाकरीवर ठेसा वाढला. ठेच्याला भाकर लावीत जयवंत जेवू लागले. गोपाळनं त्यांच्याकडं पाहिलं. आणि त्याच्या काळजात गलबलून आलं. त्याला जयवंतरावाकडं पाहावेना. तेव्हा उगीचंच कुटं तरी पाहात राहिला. जेवता जेवता मध्येच जयवंतरावांनी विचारलं,

"गोपाळा, मळ्यात मोट व्हती तवा कवा आलतास का रं मळ्यात ?"

"ह्यो काय पुसनं झालं व्हय नाना ! मोपदा आलतो की म्या मळ्यात. काय रंग व्हता तवा मळ्याला. गावातल्या समद्या मळ्यात उजवा व्हता की तुमचा मळा."

"व्हता न्हवं, ... मग आता बग बरं मळ्याकडं. कसा उन्हाळा झालाय मळ्याचा. मोट मोडून इंजिन बसवायला काय अडलं व्हंत व्हय रं ? टुकू टुकू मामला चाल्ला व्हता तोच बरा न्हवता का ?"

"त्येंच आसं हाय नाना. मोटंचा मामला जरा खरचाचा हाय. निसत्या मोटंपायी चार बईल पोसायचे म्हंजी जरा जडच हाय की !"

"आतापसवर पोसीत न्हवते का कुनी ? का आताच तेव्हडा पोसायचा सवाल



Scanned with OKEN Scanner

आला."

"तवाची बात येगळी व्हती. तवा असलं इंजनं न्हवतेच न्हवं का. आता शिवारात समद्यांकडं इंजनं झालेत. मंग मालकान्लाबी लावावं वाटलं तर काय बिघडलं! इंजिन म्हनलं की कामाचा उरकबी दांडगा असतो."

दरम्यानच्या काळात तीन चार कावळे जमा झाले. जयवंतरावाकडं टकाटका पाहात इकडून तिकडं उड्या मारू लागले. जयवंतरावाचं ध्यान कावळ्याकडं गेलं. त्यांनी भराभरा भाकरीचे तुकडे केले. हात उंचावीत कावळ्याच्या दिशेनं फेकले. भाकरीच्या तुकड्यांवर कावळे तुटून पडले. पंखाचा आवाज काढीत ते तुकडे उचलू लागले. त्यांच्याकडं पाहुन घास मोडीत जयवंतराव म्हणाले,

"बरं, ते एक जाव दे. लावलंस तर लाव इंजिन, पर भरा उकलायची काय जरूरी व्हती का बरं आज? आत्ता तोच भरा असता तर अस्याला आसं झालं असतं! कसीबी मोटंची जाडाजोड करून पाणी काढायला आलं नसतं का?"

"ह्ये मातर चुकलं बरं का त्येचं. भरा उकलायला ना फायजी व्हता मालकांनी."

त्याच्या अशा बोलण्यानं जयवंतरावांना बरं वाटलं. त्यांनी आणखी चार-दोन घास मोडले आणि समोरची भाकर बाजूला सारली. गोपाळ चकित झाल्यावनी करीत म्हणाला,

"झालं व्हय नाना?"

तांब्यातलं पाणी हातावर ओतीत जयवंतराव म्हणाले,

"झालं"

"तीन कोराबी भाकर खाल्ली न्हाव!"

"मोप खाईन म्हनतो; पर म्हातारपणात गेली फायजी की!"

गोपाळला काही तरी बोलावं वाटलं; पण त्यानं ते मुकाट्या गिळून टाकलं.

गोपाळनं सारं काही जिथल्या तिथं ठेवलं व पायात वाहाणा घालीत तो म्हणाला,

"बरं मगं नाना! चलतो आता. गावात जाईस्तवर पारग्या सुटायचा वकत व्हतो."

"बरं जा. कुटं हायीत आता कुळवं?"

"इनामात हायीत."

"दाबून घाल जरा पाळी. बेचकाडाचं रान हाय."

गोपाळानं होकार भरला व कामाच्या ओढीनं तो चालता झाला.

जयवंतरावांना अवघडल्यावानी वाटू लागलं. त्यांनी खोपीतलं घोंगडं आणलं. चिंचच्या सावलीत अंथरल व अवघडलेलं अंग घोंगड्यावर टाकलं. थोड्याच वेळात त्यांचा डोळा लागला.

कसल्या तरी आवाजानं त्यांना जाग आली पडल्यापडल्याच त्यांनी आवाजाचा कानोसा घेतला. आवाज जीपचा असावा असं वाटत होतं.

जयवंतराव घोंगड्यावर उठून बसले. आवाजाच्या दिशेनं त्यांनी पाहिलं. मळ्याजवळून जाणाऱ्या वाटेनंच जीप येत होती. धुरोळा उडवीत जीप आली आणि मळ्याजवळ येताच ती गचकन थांबली. जीपमध्ये खच्चून माणसं भरले होते. अलीकडच्या तोंडालाच सदाशिव बसला होता. जीप थांबताच त्यानं खाली उडी घेतली. दुसऱ्या एकाला मागोमाग येण्याविषयी खुणावलं. व तो तडातडा चालत मळ्याकडं आला. मळ्यात शिरताच त्यानं उसाच्या उभ्या पिकाकडं पाहिलं. आणि नंतर तो खोपीकडं आला. खोपीतली पाण्याची



Scanned with OKEN Scanner

घागर आणि तांब्या सोबतच्या माणसाच्या हवाली केला. जीपमध्ये बसलेल्या सर्वांना पाणी पाजवायला सांगितलं आणि नंतर तो चिंचच्या सावलीत आला. जयवंतरावांना म्हणाला.

"जेवलाव का नाना ?"

"आताच जेवलो."

आणि दुसरं काही विचारावयाचा अवकाश न देताच त्यांनी विचारलं,

"इंजिनाचं कुटवर आलंय रं !"

"आज दुरुस्त झालं आसंल काय की !"

त्याच्या अशा बोलण्याचा जयवंतरावांना राग आला. फटकारा मारल्यावनी ते त्याला म्हणाले,

"म्हंजी तुला त्येचा पत्त्याबी न्हाई म्हन की"

गडबडल्यावनी करीत सदाशिव म्हणाला,

"पत्त्या नसायला काय झालं; पर सध्याच्याला माझ्या म्हागं जरा गडबड हाय नव्हं का. आपले मानीकराव पाटील हायीत का न्हाईत, ते हुभे हायीत बँकीच्या विलेक्शनला. त्येंच्या परचारापायी हिंडावं लागायलंया."

"लोकावांचे विलेक्शनच करीत फिरत बस ! लई दूध द्यायलाया तुला तो मानीकराव का फिनीकराव !"

"गरामपंचायतीच्या विलेक्शनात किती मदत केली त्येनी मला. ते व्हते म्हणून तर म्या निवडून आलो."

"आता ह्ये धंदे करीत बस. सोंसारच चलनार हाय न्हवं त्येंच्यावर तुजा !"

सदाशिवानं इतका वेळ मनावर संयम ठेवला होता. पण जयवंतराव असं बोलू लागले तेव्हा त्याचा मनावरचा संयम उडाला. आवाजाला धार चढवीत तो म्हणाला,

"आसं तिठ्यात बोलायला इतकं झालं तरी काय म्हनावं ?"

"काय झालं ते दिसत न्हाई का ! ऊस कसा वाळून चाल्लाया ते बगितलास का ? काय न्हायलंया आता त्या उसात ?"

"मंग म्या तरी काय करू ! मला त्या उसाची काळजी न्हाई आसं थोडंच हाय !"

"काळजी आसती तर कस्याला असं गोसावी-फकीरावनी फिरत बसला असतात. तवाचं मिट्टी लावून इंजन दुरुस्त केलं नसतंस का !"

"किती मिट्टी लावायची व्हती. पंधरा दिवस झाले त्येच्या म्हागंच हाय न्हव का !"

"आसं आसतं व्हय म्हागं न्हानं. आदुळ्यावरनं काय जनावरं हानायला येत आसतेत का !"

"पानी तरी आसं कोंच बोंबलायला गेलं म्हणावं हिरीत. सकाळा इंजिन लावलं तर सानपसवर पानी पार तकटून निगल. समदंबी रान पानी पेतं का न्हाई कुनाला ठावं !"

"कार्तिकातलं ऊन हाय न्हवं का. रान पार आकसून धरलेले आसतेत. त्येतनं पाऊसकाळबी कमी झालाया."

"मंग इंजन आलं तरी काय उपेगाचं ! रोजचे शंभर-पन्नासबी वाफे भिजतेत का न्हाई कुनाला ठावं !"

"तेव्हडेबी भिजलेल तरी बरंच हाय की ! कायमचं पानी तुटन्या आयवजी आठ दिसाला येढा आला तरी तेव्हडाच आधार उसाला !"

"तसल्या आधारानं काय व्हनार हाय असल्या दिसाला! पाच सा दिसाला तरी येढा आला फायजी."

"मग फोडून घ्यायचं करावं. घालावे हजार-पाचशे रुपये हिरीत. कटकट तरी मिटलं की पान्याची !"

"तेव्हडी फुरसत फायजी की मानसाला! एकल्या जीवानं कुटं कुटं बगावं तरी! हीर फोडायची म्हंजी पंधरा-ईस दिवस तेच एक डोसक्यात घिऊन बसावं लागल !"

"मग बिघडलं काय त्येच्यात !आसले बिनभाड्याचे काम करन्यापरीस बरं न्हाई का ह्ये!"

"लोक आपल्यापायी करतेत म्हणून आपून लोकापायी करायचं. एरवी काय हाऊस हाय का आसल्या कामाची !"

"तुझा आसला स्वभाव ठावं व्हता म्हणून तर म्या भरा उकलायला नगं म्हणलं व्हतं. पर आयकिलंस कवा माजं. भरा आसता तर उसनंपासनं करून हळू नेटं मोट हानली नसती का ?"

"मला काय ठाव व्हतं का आसं काय हुईल म्हणून. झालंच तर दगडाचं काम पडलं म्हणूनच उकलला भरा. बिनकामाचं तर उकलला न्हाई की!"

"भऱ्याला नसताच दगड तर काय केलं असतंस ? कुठून तरी आणला असतास का न्हाई ? मंग तवाच ना आनायला काय झालतं ? आज किती उपेगाला आला असता भरा!"

जयवंतरावांनी त्याला असं फैलावर घ्यायला सुरुवात केली तेव्हा सदाशिव रागाला आला. फटकारा मारल्यावनी म्हणाला,

"नाना तुम्ही तरी मळ्याचा कारभार करा अगर मला तरी करू द्या. उगं सातदा असल्या कटकटी नगं. उगं माणसानं आसं काय करायला जावं तर आडवा दांडा मधी हायच तुमचा. आस्यानं मेळ तरी कसा लागायचा !"

खाडकन् गालात मारावं तसं जयवंतरावांना वाटलं. त्यांच्या डोळ्यांत ताबडतोब पाणी खळखळलं. मुळं निसटलेल्या घाटावानी ते बसून राहिले. तेवढ्यात पाण्याची बिंदगी घेऊन गेलेला तो माणूस परत आला. खोपीत बिंदगी ठेवीत म्हणाला,

"चला जल्दी. उशीर व्हायला म्हनायलेत मानीकराव."

सदाशिवाने ते लक्षात घेतलं. एकवार त्यानं बापाकडं पाहिलं आणि दुसऱ्याच क्षणी तोंड फिरवून तो जीपच्या रोखानं निघाला.

धुरोळा उडवीत जीप गेली आणि मोडायला आल्यावनी जयवंतराव बसून होते. लेकाचं बोलणं त्यांच्या काळजाला भिडलं होतं. त्यांच्या डोळ्यांतून सारखं पाणी झिरपत होतं. याच मळ्यात ते खपले होते. मळा नावारूपाला आणला होता. आणि त्याच मळ्याची आज अशी अवस्था पाहण्याचं त्यांच्या नशिबी आलं होतं... लई मन तुटायलंय... हालत बगवत न्हाई डोळ्याला. काय हालतीत मळा व्हता आन् काय हालतीत बगायचा झाला... पर आपून तरी काय करावं त्येला. हातात व्हतं तंवर मस्त केलं. आता त्येचा संसार त्येच्यासंग. आयकिंल तवर सांगितलं. अता आयकतच न्हाई तर कस्याला सांगावं?... आता काम आपलं ऱ्हायलंयाच काय ? परसोध्यानचं काम झालं. बसावं वाटलं तर बसावं मळ्यात नाय तर ऱ्हावं गावात हरी हरी करीत.... तसंच करावं झालं. खपंना का मळा तिकडं. आपल्याला



Scanned with OKEN Scanner

काय करायचं... आता या पुढं मळ्याकडं ध्यान द्यायचं नाही, आपला असून नसल्यावानी वागायचं; असं त्यांनी ठरवून टाकलं व त्याच अवस्थेत ते बसून राहिले. किती तरी वेळ ते तशा स्थितीत बसून होते. त्यांना अचानक उसात कसली तरी खसपस जाणवली. त्यांनी उसाच्या रोखानं पाहिलं. कुणाची तरी गाय उसाला पडली होती. उसाचे शेंडे दचादच दातानं खुडीत होती. जयवंतरावांना राहवंना. लटपटत ते उभे राहिले. हातातली काठी सावरीत गाईला हाकण्यासाठी धावले.

(वाळवण)

★★★



Scanned with OKEN Scanner